# प्रेस नोट ता. ११/१२/२०२०

## औंध हॉस्पिटलचे आवारात तरुणाचा निर्घृण खुन करणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड कडुन अवघ्या ०८ तासाच्या आत अटक व गुन्हा उघड

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, दि. १०/१२/२०२० रोजी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास सांगवी पोलीस ठाणे हद्दित औंध हॉस्पिटल कॅम्पच्या आवारत आरोपी नामे अक्षय नाईक व विक्रमसिंग या दोघांनी मिळुन मयत नामे शेखर ऊर्फ बबलु मनोहर चंदाले, वय-२७ वर्षे रा- सांगवी याचे डोक्यावर जड वस्तुने प्रहार करुन निर्घृण खुन केल्याने **सांगवी पोलीस ठाणे येथे गु.र.नंबर-४६७/२०२० भा.दं.वि.कलम ३०२, ३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा प्रकार हा औंध हॉस्पिटलचे आवारात झालेला असल्याने व त्यामुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाल्याने याबाबत **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश** यांनी गंभीर दखल घेतल्याने **मा. पोलीस उप-आयुक्त सो, गुन्हे, श्री सुधीर हिरेमठ,** यांनी याबाबत गुन्हे शाखेस समांतर तपास करुन ताबडतोब आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड** यांचे मार्गदर्शनाखाली **सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख** यांनी त्यांचे पथकासह सदरच्या गंभीर गुन्हयाचा समांतर तपास सुरू करुन आरोपींचा शोध सुरु केला होता.

सदरचे दोन्ही आरोपी हे गुन्हा केल्या नंतर मोबाईल फोन बंद करुन पळुन गेल्याने त्यांचा शोध घेणे कठिण जात होते. त्यावेळी सदर पथकाने आरोपींच्या मित्रांची माहिती काढुन सदर मित्रांचे मदतीने आरोपी गुन्हा केले नंतर लपुन बसण्याची शक्यता असलेली सर्व ठिकाणे रात्रीतुन शोधुन काढली. त्यावेळी सदर आरोपी हे आंबडेकर चौक, भाऊ पाटील रोड, बोपोडी येथे नाल्याचे कडेला लपुन बसले असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपी नामे **१) अक्षय अशोक नाईक, वय-२३ वर्षे, रा- जिल्हा सरकारी हॉस्पिटल मागे, सर्व्हेंट कॉर्टर, सांगवी फाटा, औंध, पुणे** २) **विक्रम ऊर्फ बिकु श्रीकेसरीन सिंग, वय-१८ वर्षे रा-गल्ली नंबर-२४, रेल्वे क्रॉसिंग गेट समोर, बोपोडी, पुणे** यांना शिताफीने ताब्यात घेतले.

सदर आरोपींना ताब्यात घेतलेवर मुख्य आरोपी नामे अक्षय नाईक याचे कडे केलेल्या चौकशीत त्याने त्याचा साथिदार नामे विक्रमसिंग याचे सह मिळुन पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन सदरचा गंभीर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तरी गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व कर्मचारी यांनी धडाडीने व कसुन तपास करुन गुन्हा दाखल झाल्या पासुन ०८ तासाच्या आत मुख्य आरोपीस त्याचे साथिदारासह अटक करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

यातील मयत हा रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्याचे विरुद्ध यापुर्वी सांगवी पोलीस ठाणे येथे मारामारीचा ०१ गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपींना पुढील कारवाई कामी सांगवी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले असुन पुढील तपास सांगवी पोलीस ठाणे करीत आहे. तसेच इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, अतुल लोखंडे व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.**

**(प्रसाद गोकुळे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड


गुन्हे शाखा युनिट ४
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
PAYEGAA